Date: August 25, 2026

To,	To,
BSE Limited, Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Fort, Mumbai-400001. **Scrip Code: 505850** **Debt Scrip Code: 976597, 977659, 977808**	**National Stock Exchange of India Limited,** Exchange Plaza, C-1, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai: 400051. **Scrip Symbol** : **MANCREDIT**

Dear Sir/Madam,

Sub: Submission of newspaper clippings titled "Information Regarding 64th Annual General Meeting of Mangal Credit and Fincorp Limited."

Pursuant to Regulation 30 and other applicable Regulations of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of newspaper advertisement published in today's newspapers i.e. News Hub (English) and Pratahkal (Marathi), in compliance with General Circular No. 03/2025 dated September 22, 2025 issued by Ministry of Corporate Affairs **("MCA")** and SEBI Circular No. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 dated October 3, 2024 issued by SEBI, intimating, *inter alia,* that the 64th Annual General Meeting of the Company will be held on Tuesday, September 22, 2026 at 12.30 P.M. (IST) through Video Conferencing **('VC')** /Other Audio Visual Means **("OAVM")**.

A copy of the publication is also hosted on the Company's website at www.mangalfincorp.com

We request you to kindly take the above on record.

Thanking you,

Yours faithfully,
For Mangal Credit and Fincorp Limited

CHIRAG NARENDRA PARMAR
Digitally signed by CHIRAG NARENDRA PARMAR
Date: 2026.08.25 16:12:01 +05'30'

Chirag Narendra Parmar
Company Secretary and Compliance Officer
Membership No. ACS 66852

Encl: As above

Meghashray Honors Eminent Personalities with Best Citizen Award 2026,

Mumbai, Ajay Upadhyay:

A good or ideal citizen is one who follows the laws of the country, understands both rights and responsibilities, contributes to the welfare of society, and respects the unity and integrity of the nation.

The leading social organization Meghashray organized a grand ceremony at The St. Regis Hotel in Lower Parel, Mumbai, where eminent personalities from different fields were honored with the Best Citizen Award 2026 for their inspiring and outstanding contributions.

The event was graced by Maharashtra Governor Jishnu Dev Varma, Cabinet Minister Advocate Ashish Shelar, and Ramlal, All India Contact Head of the Rashtriya Swayamsevak Sangh (RSS), as the chief guests.

Among those honored were Member of Parliament and actor Ravi Kishan, renowned storyteller Jaya Kishori, Padma Shri Hariharan, filmmaker Subhash Ghai, Param Vir Chakra awardee Yogendra Yadav, Padma Shri Ashok Lakshman Shroff, actress Bhumi Pednekar, Padma Shri

Sanjeev Kapoor, Sujay Jayraj, Abhimanyu Singh, Abhishek Singh, Ahmed Khan, Salim Merchant, Jayeshraj Bhanchandra Joshi, Jaleel D. Parker, Laxmi Agarwal, Kedar Narayan Joshi, and Devansh Dhangar.

Speaking on the occasion, Maharashtra Governor Jishnu Dev Varma praised Meghashray Chairperson Seema Singh for her initiative. He said that selecting just 10–20 individuals from among crores of people across the country for such a prestigious honor is a challenging task. He appreciated the selection of personalities who have made significant contributions to India in different fields.

The Governor said that such individuals have demonstrated tremendous dedication, hard work and commitment towards the nation. Their passion and love for the country have contributed to India's growing stature across the world. He also congratulated Seema Singh and her family for organizing the prestigious event.

On the occasion, Shreyas Singh and Meghna Singh, son and daughter of Meghashray founder Seema Singh, welcomed and felicitated Governor Jishnu Dev Varma on behalf of the organization by presenting him with a shawl, coconut and floral bouquet.

The grand ceremony witnessed the presence of thousands of people from different states and various professional fields, making the event a memorable celebration of individuals who have made noteworthy contributions to society and the nation.

Mona Mishra of Zoya Creations Honoured for Excellence in Media & Advertising at Pravasi Rajasthani Summit 2026

Mumbai,

Mona Mishra, Director of Zoya Creations, was honoured with the 'Excellence in Media & Advertising' award at the prestigious Bharat 24' s Pravasi Rajasthani Summit 2026, organised by Bharat24 at Hotel The Lalit, Mumbai.

The award was presented to Mona Mishra by Union Minister of State for Agriculture & Farmers' Welfare Bhagirath Choudhary, recognising her contribution and achievements in the media and advertising industry.

The prestigious summit witnessed the presence of several prominent political leaders and distinguished personalities, including Union Minister Arjun Ram Meghwal, Maharashtra Minister Mangal Prabhat Lodha and Maharashtra Minister Ashish Shelar, who attended the event and participated in its various sessions.

Mona Mishra has been associated with the media and advertising sector for several years and, through Zoya Creations, has built strong relationships across the Indian media landscape.

Zoya Creations, a Mumbai-based advertising and media agency, has been operating successfully for the past 17 years. Over the years, the agency has worked extensively with several of India's leading publications and television news channels, providing advertising, media planning and communication solutions to its clients.

The recognition at the Pravasi Rajasthani Summit 2026 marks another significant milestone for Mona Mishra and Zoya Creations, acknowledging their sustained contribution to the advertising and media industry.

The summit brought together prominent leaders, entrepreneurs, business personalities and achievers from diverse fields, while celebrating the contribution of the Rajasthani community to India's economic growth, entrepreneurship and nation-building.

Dr. Dinesh Ramanaresh Singh Honoured with Global Icon Award 2026

Global Icon Award - Delhi

NEW DELHI, (DINESH SINGH):

Dr. Dinesh Ramanaresh Singh was honoured with the prestigious Global Icon Award 2026 in the category of "Pioneering Leader in School & Competitive Education" at a grand ceremony held at Hotel Hyatt Centric, New Delhi, on August 22, 2026.The award was presented by Shri Salman Khurshid, former Union Minister of External Affairs, Government of India, in recognition of Dr. Singh's outstanding contribution to school education and competitive exam coaching. Dr. Singh has been widely acknowledged for his commitment to academic excellence, innovative teaching methodologies, and efforts to empower students through quality education. Receiving the Global Icon Award marks another milestone in his distinguished career and reflects his dedication to shaping the future of education in India.The honour celebrates his leadership and lasting impact on the education sector.

प्रातःकाल
www.pratahkal.com

संपादकीय

तरुणाईच्या भवितव्याचा प्रश्न

भारत जगातील सर्वांत तरुण देशांपैकी एक असल्याचा अभिमान आपण सातत्याने मिरवतो. तरुणांची प्रचंड संख्या ही भारताची 'लोकसंख्यात्मक लाभांशाची' ताकद असल्याचे प्रत्येक सरकार सांगत आले आहे. पण हातात पदवी असूनही नोकरी नाही, नोकरीसाठी परीक्षा दिली तर निकालाचा भरवसा नाही, परीक्षा झाली तर पेपरफुटीची भीती, भरती जाहीर झाली तर नियुक्तीची प्रतीक्षा आणि या सगळ्यातून मार्ग काढण्यासाठी शिक्षण घेताना कुटुंबाची आयुष्यभराची बचत खर्ची पडत असेल, तर हा लाभांश किती काळ लाभांश राहणार? काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नावर विचारलेले सवाल राजकीय असले, तरी त्यामागील तरुणाईची अस्वस्थता केवळ राजकारण म्हणून फेटाळून लावता येणार नाही. कारण रोजगाराचा प्रश्न सरकार आणि विरोधकांच्या आरोप-प्रत्यारोपापेक्षा कितीतरी मोठा आहे; तो भारताच्या पुढील दोन-तीन दशकांच्या आर्थिक भविष्याचा प्रश्न आहे.

खरगे यांनी नीती आयोग आणि नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षणातील आकडे पुढे करीत सरकारवर टीकेची झोड उठविली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, १५ ते २९ वयोगटातील तब्बल ८.७ कोटी भारतीय शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षण या तिन्हींपैकी कशातही सहभागी नाहीत. त्यांपैकी जवळपास ८८ टक्के जण घरगुती कामांमध्ये गुंतलेले आहेत. जुलै २०२६ च्या श्रमशक्ती सर्वेक्षणाचा संदर्भ देत त्यांनी तरुणांमधील बेरोजगारी १५.६ टक्के, तर तरुण महिलांमध्ये ती १९.५ टक्के असल्याचा दावा केला आहे. राजकीय पक्ष आकडेवारीचा आपल्या सोयीने अर्थ लावत असतात आणि त्यामुळे या आकडेवारीच्या संदर्भांची स्वतंत्र चिकित्सा आवश्यक असते. मात्र त्यातून उपस्थित होणारा मूळ प्रश्न बदलत नाही—भारताच्या तरुणांना त्यांच्या शिक्षणाशी, कौशल्याशी आणि आकांक्षांशी सुसंगत पुरेशा रोजगारसंधी उपलब्ध होत आहेत का?

विशेषतः पदवीधर बेरोजगारीचा मुद्दा अधिक गंभीर आहे. खरगे यांच्या दाव्यानुसार २० ते २९ वयोगटातील बेरोजगारांमध्ये पदवीधरांचे प्रमाण ६७ टक्के आहे, तर १५ ते २५ वयोगटातील पदवीधरांची बेरोजगारी जवळपास ४० टक्क्यांवर आहे. एखाद्या देशात अशिक्षितांपेक्षा उच्चशिक्षित तरुणांना रोजगारासाठी अधिक प्रतीक्षा करावी लागत असेल, तर त्याकडे केवळ 'नोकऱ्या कमी आहेत' म्हणून पाहता येणार नाही. शिक्षणव्यवस्था काय शिकवते आणि अर्थव्यवस्थेला कोणती कौशल्ये हवी आहेत, यातील दरीही त्यातून स्पष्ट होते. अभियांत्रिकी, व्यवस्थापन किंवा अन्य पदवी हातात घेऊन तरुण पुन्हा वेगवेगळ्या कौशल्य अभ्यासक्रमांकडे वळत असेल, तर पदवी आणि रोजगार यांच्यातील तुटलेली साखळी जोडण्याची जबाबदारी शिक्षण धोरणावरही येते.

या समस्येला आणखी एक आर्थिक बाजू आहे. मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीय कुटुंबे मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्यभराची बचत खर्च करतात. अनेक विद्यार्थी शैक्षणिक कर्ज घेतात. खासगी शिक्षणाचा वाढता खर्च, शहरातील निवास, स्पर्धा परीक्षांचे शुल्क आणि शिकवणीचा खर्च या साऱ्याचा भार सहन केल्यानंतरही नोकरीची खात्री नसेल, तर बेरोजगारी ही केवळ त्या तरुणाची समस्या राहत नाही; ती संपूर्ण कुटुंबाची आर्थिक समस्या बनते. याच वेळी जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या, तर उत्पन्न नसलेल्या तरुणासह कुटुंबावर दुहेरी दबाव येतो. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी बेरोजगारीसोबत महागाईचा मुद्दा जोडण्यामागे हीच राजकीय गणिताची नस पकडलेली दिसते. रमेश यांनी एका महिन्यात कांद्याच्या किमती ७६ टक्क्यांपर्यंत वाढल्याचा, काही राज्यांत घाऊक दर दुप्पट झाल्याचा आणि सरकारी कांदा राखीव साठा संपल्याचा दावा केला आहे. साखरेनंतर कांदा, दूध, तेल, फळे आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य माणूस आणि मध्यमवर्गीय अर्थसंकल्प बिघडत असल्याचा त्यांचा आरोप आहे.

रोजगाराच्या मुद्द्यावर मात्र सरकारसमोर राजकीयदृष्ट्या अधिक कठीण प्रश्न आहे. भारतीय जनता पक्षाने पूर्वी दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्मितीचे आश्वासन दिल्याचा संदर्भ देत खरगे यांनी बारा वर्षांत २४ कोटी रोजगार कुठे आहेत, असा सवाल केला. सरकार या गणिताशी असहमत असेल, तर त्याने रोजगार निर्मितीची स्वतःची स्पष्ट, तुलनात्मक आणि विश्वासार्ह आकडेवारी जनतेसमोर ठेवली पाहिजे. भविष्य निर्वाह निधीतील नोंदणी, मुद्रा कर्ज, स्वयंरोजगार, गिग अर्थव्यवस्था आणि औपचारिक रोजगार यांची एकत्र बेरीज करून प्रश्न सुटत नाही. 'रोजगार' किती निर्माण झाले याबरोबरच ते किती स्थिर आहेत, किती उत्पन्न देतात आणि त्यांना सामाजिक सुरक्षा किती आहे, हेही महत्त्वाचे आहे.

सरकारी विभागांतील रिक्त पदे हा त्यातील दुसरा संवेदनशील मुद्दा. एका बाजूला लाखो तरुण सरकारी भरतीसाठी वर्षानुवर्षे तयारी करतात आणि दुसऱ्या बाजूला रिक्त जागा असूनही भरती प्रक्रिया लांबत असेल, तर असंतोष निर्माण होणारच. त्यात पेपरफुटी, परीक्षा रद्द होणे, निकाल रखडणे आणि न्यायालयीन वादांची भर पडते. एका परीक्षेसाठी तरुणाच्या आयुष्यातील दोन-तीन वर्षे खर्ची पडतात. प्रशासनासाठी भरती सहा महिने पुढे जाणे ही फाईलवरील बाब असू शकते; उमेदवारासाठी मात्र ती वयोमर्यादा, आर्थिक परिस्थिती आणि आयुष्यातील संधी गमावण्याची बाब असते. म्हणूनच परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता हा रोजगार धोरणाचाच भाग मानला पाहिजे.

खरगे यांनी शिक्षणव्यवस्थेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव वाढल्याचा आरोपही केला आहे. हा स्पष्टपणे राजकीय आरोप असून सरकार त्याला प्रत्युत्तर देईल. परंतु शिक्षणव्यवस्थेवरील खरा सार्वजनिक वाद अभ्यासक्रम कोणाच्या विचारांचा आहे एवढ्यापुरता मर्यादित राहू नये. विद्यापीठांमधील शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन, शिक्षकांची रिक्त पदे, उद्योगांना आवश्यक कौशल्ये आणि विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता यावर अधिक गंभीर चर्चा हवी. पदवीधारकांची संख्या वाढणे आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था उभी राहणे या दोन भिन्न गोष्टी आहेत.

भारतासमोर आज एक विलक्षण संधी आहे. उत्पादन, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, अवकाश तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, संरक्षण उत्पादन आणि सेवा क्षेत्रात रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होत आहेत. पण आर्थिक वाढ आणि रोजगारवाढ यांचे नाते अधिक मजबूत करावे लागेल. मोठ्या उद्योगांबरोबर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना भांडवल, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कारण कोट्यवधी रोजगार निर्माण करण्याची क्षमता केवळ काही मोठ्या कंपन्यांमध्ये नसून देशभर पसरलेल्या छोट्या उद्योगांमध्ये आहे.

सरकारने विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला राजकीय हल्ला म्हणून उत्तर देणे आणि विरोधकांनी प्रत्येक आर्थिक अडचणीला सरकारचे संपूर्ण अपयश ठरविणे यातून तरुणांना रोजगार मिळणार नाही. सरकारकडे सत्ता असल्याने उत्तरदायित्वाचा मोठा वाटा अर्थातच त्याच्याकडे आहे; पण राज्य सरकारे, विद्यापीठे, उद्योग आणि कौशल्य संस्था यांनाही जबाबदारी स्वीकारावी लागेल. भारताची तरुण लोकसंख्या ही कायमची उपलब्ध असलेली संपत्ती नाही. काही दशकांनंतर देशाचे वय वाढणार आहे. आजचा तरुण रोजगारक्षम, उत्पादक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर तो भारताचा सर्वांत मोठा लाभांश ठरेल; तोच तरुण निराश, बेरोजगार आणि व्यवस्थेवरील विश्वास गमावून बसला, तर हीच ताकद सर्वांत मोठे सामाजिक आव्हान ठरू शकते. म्हणून प्रश्न फक्त 'नोकऱ्या कुठे आहेत?' एवढाच नाही; भारताच्या तरुणाईला तिच्या क्षमतेइतके भविष्य आपण देणार आहोत का, हा त्याहून मोठा प्रश्न आहे.

ईद-ए-मिलाद : पैगंबरांचा संदेश आणि माणुसकीची आजची गरज

प्रवीण बागडे
नागपूर

ईद-ए-मिलाद म्हणजे केवळ एका धार्मिक उत्सवाचा दिवस नाही, तर तो माणुसकीला माणुसकीची जाणीव करून देणारा दिवस आहे. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मस्मरणाचा हा दिवस त्यांच्या जीवनातील करुणा, समता, बंधुता, संयम, न्याय आणि शांततेच्या संदेशाचे स्मरण करून देतो. आज जग विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रचंड पुढे गेले असले, तरी माणसाच्या मनातील द्वेष, हिंसा, असहिष्णुता आणि भेदभाव अद्याप संपलेला नाही.

म्हणूनच ईद-ए-मिलादचा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरतो. धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो; तो माणसामाणसांत भिंती उभ्या करण्यासाठी नसतो. श्रद्धा मनाला नम्र बनवत नसेल, तर त्या श्रद्धेच्या अर्थाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. ईद-ए-मिलादचा खरा अर्थही याच ठिकाणी सापडतो. माणसावर प्रेम करा, दुर्बलाच्या पाठीशी उभे राहा, अन्यायाला विरोध करा आणि समाजात शांतता व बंधुभाव निर्माण करा. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जीवनाकडे पाहिले तर त्यांच्या संदेशाच्या केंद्रस्थानी माणूस दिसतो. गरीब, अनाथ, विधवा, वंचित आणि दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता हा त्यांच्या शिकवणीचा महत्त्वाचा भाग होता.

माणसाची प्रतिष्ठा त्याच्या संपत्तीने, वंशाने किंवा सामाजिक स्थानाने ठरत नाही, तर त्याच्या चारित्र्याने आणि कर्माने ठरते, हा विचार समाजाला समतेच्या दिशेने नेणारा आहे. आजच्या समाजासमोर सर्वांत मोठे आव्हान कोणते असेल, तर ते माणसामाणसांमधील वाढते अंतर. धर्माच्या नावावर संशय, जातीच्या नावावर तिरस्कार, राजकीय मतभेदांवरून वैर आणि सामाजिक माध्यमांवरील अफवांमुळे निर्माण होणारा द्वेष, ही लोकशाही समाजासाठी धोक्याची चिन्हे आहेत. अशा वातावरणात ईद-ए-मिलादचा संदेश केवळ एका समाजापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण मानवतेपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. आज धार्मिक सणांचे स्वरूपही अनेकदा बदलताना दिसते.

सण म्हणजे आनंद, श्रद्धा आणि परस्पर भेटीगाठी यापेक्षा शक्तिप्रदर्शन, मोठमोठे आवाज, दिखावा आणि सोशल मीडियावरील प्रदर्शन यापुरते मर्यादित होत असतील, तर आपण सणाच्या आत्म्यापासून दूर जात आहोत. कोणत्याही धर्माचा उत्सव माणसाच्या दुःखाकडे पाठ फिरवून पूर्ण होऊ शकत नाही.

एखाद्या गरीबाच्या घरात अन्न पोहोचले, एखाद्या निराधाराला आधार मिळाला, एखाद्या आजारी व्यक्तीला मदत झाली, एखाद्या दुःखी मनाला दिलासा मिळाला, तरच धार्मिकतेला खरा अर्थ प्राप्त होतो. आज ईद-ए-मिलादच्या निमित्ताने समाजाने याच माणुसकीची मशाल पेटवण्याची गरज आहे. आज जगात युद्धे सुरू आहेत. निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत. धर्म आणि वंशाच्या नावावर माणूस माणसाचा शत्रू बनत आहे. द्वेषाचे राजकारण अनेक ठिकाणी समाजाला अस्थिर करत आहे.

अशा वेळी शांतता हा केवळ सुंदर शब्द न राहता तो सामाजिक व्यवहाराचा भाग झाला पाहिजे. भारतासारख्या बहुधर्मी आणि बहुसांस्कृतिक देशात या संदेशाचे महत्त्व आणखी मोठे आहे. भारताची ताकदच विविधतेत आहे.

मंदिरातील घंटानाद, मशिदीतील अजान, गुरुद्वारातील कीर्तन, चर्चमधील प्रार्थना आणि बौद्ध विहारातील शांतता, या सर्व आवाजांनी भारतीय संस्कृतीची समृद्ध वीण तयार केली आहे. या विविधतेला संघर्षाचे कारण बनवणे म्हणजे भारताच्या आत्म्यालाच कमकुवत करणे होय. धर्म कोणताही असो, अश्रूंची भाषा एकच असते. भूक कोणत्याही धर्माची नसते. दुःखाला जात नसते. मृत्यूला पंथ नसतो आणि माणुसकीला सीमा नसते.

म्हणूनच ईद-ए-मिलाद हा फक्त मुस्लिम बांधवांचा सण म्हणून पाहणे हा त्याच्या व्यापक मानवी संदेशाला मर्यादा घालण्यासारखे आहे.

पैगंबरांच्या जीवनातील करुणा, प्रामाणिकपणा, न्याय आणि बंधुभावाचे मूल्य प्रत्येकाने आत्मसात करण्याची गरज आहे.

आज आपल्या समाजाला धार्मिकतेपेक्षा धर्मभावनेची शुद्धता अधिक आवश्यक आहे. धर्माच्या नावावर दुसऱ्याचा अपमान करणे ही धार्मिकता नाही. दुसऱ्याच्या श्रद्धेचा अवमान करणे ही श्रद्धेची ताकद नाही.

आपल्या धर्मावर प्रेम करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण त्याच वेळी दुसऱ्याच्या धर्माचा सन्मान करण्याची जबाबदारीही प्रत्येकाची आहे. लोकशाहीमध्ये मतभेद असतीलच. विचार वेगळे असतीलच.

श्रद्धा वेगळ्या असतीलच. पण मतभेदांचे रूपांतर मनभेदांत होऊ नये.

असहमती ठेवता येते, शत्रुत्व ठेवण्याची गरज नसते. हे शिकवणे हीच आजच्या काळातील मोठी सामाजिक गरज आहे. ईद-ए-मिलादच्या दिवशी मिरवणुका, सजावट आणि धार्मिक कार्यक्रम होतील.

ते श्रद्धेचे अभिव्यक्तीस्वरूप आहे. मात्र या उत्सवातून समाजाला आणखी काही मिळाले पाहिजे. रक्तदान शिबिरे, गरिबांना अन्नधान्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रुग्णांना मदत, अनाथ आणि वृद्धांना आधार, पर्यावरण संवर्धन अशा उपक्रमांतून सणाचे सामाजिक रूप अधिक प्रभावी होऊ शकते.

कारण देवाच्या नावाने केलेली प्रार्थना ओठांवर असते, पण गरजूच्या मदतीला धावून जाणारी माणुसकी हृदयात असते. आज तरुण पिढीसमोरही मोठे आव्हान आहे. सोशल मीडियावर एका क्षणात द्वेष पसरतो. अपूर्ण माहितीवरून निष्कर्ष काढले जातात. अफवा सत्यापेक्षा वेगाने पसरतात.

अशा वेळी तरुणांनी विवेक, संयम आणि सत्याची बाजू घेणे आवश्यक आहे. धर्माच्या नावाने कोणताही अपमानास्पद, द्वेषपूर्ण किंवा हिंसक संदेश पुढे पाठवण्यापूर्वी थांबणे हीदेखील सामाजिक जबाबदारी आहे. ईद-ए-मिलादचा खरा उत्सव मशिदीच्या भिंतींपलीकडे आणि मिरवणुकीच्या रस्त्यापलीकडे गेला पाहिजे. तो गरीबाच्या झोपडीपर्यंत, अनाथाच्या डोळ्यांपर्यंत, विधवेच्या दुःखापर्यंत, शेतकऱ्याच्या संघर्षापर्यंत आणि बेरोजगार तरुणाच्या अस्वस्थतेपर्यंत पोहोचला पाहिजे.

पैगंबरांच्या जन्मस्मरणाचा दिवस आपल्याला एक साधा पण कठोर प्रश्न विचारतो, आपण श्रद्धाळू झालो, पण आपण खरे माणूस झालो का? जर आपल्या प्रार्थनेनंतरही दुसऱ्याच्या वेदना आपल्याला जाणवत नसतील, तर आपली प्रार्थना अपुरी आहे. जर आपल्या धार्मिक उत्सवात शेजाऱ्याच्या दुःखाला जागा नसेल, तर आपल्या उत्सवाचा अर्थ अपुरा आहे. आणि जर धर्म आपल्याला नम्र, न्यायप्रिय, दयाळू आणि संवेदनशील बनवत नसेल, तर धर्माच्या नावापेक्षा त्याच्या आचरणाकडे पाहण्याची वेळ आली आहे.

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने आज एक संकल्प करू या, धर्म जपू या, पण माणुसकी जपू या, श्रद्धा जपू या, पण संवेदनशीलताही जपू या, आपली ओळख जपू या, पण दुसऱ्याच्या अस्तित्वाचा सन्मानही करू या. कारण शेवटी कोणत्याही धर्माची खरी परीक्षा मंदिरात, मशिदीत किंवा प्रार्थनास्थळी होत नाही, तर ती होते माणूस दुसऱ्या माणसाशी कसा वागतो यामध्ये. ईद-ए-मिलादचा चंद्र आकाशात उगवताना त्याचा प्रकाश एका समाजापुरता मर्यादित राहत नाही. तो सर्वांच्या अंगणात पडतो. त्याचप्रमाणे पैगंबरांचा माणुसकीचा संदेशही एका धर्मापुरता मर्यादित राहू नये.

द्वेषाच्या काळोखात माणुसकीचा दिवा पेटवणे, अन्यायाच्या गर्दीत न्यायाची बाजू घेणे, भुकेल्याला अन्न देणे आणि दुःखी माणसाला आधार देणे, यापेक्षा मोठी ईद कोणती? याच माणुसकीच्या प्रकाशात ईद-ए-मिलाद साजरा झाला, तर तो केवळ धार्मिक उत्सव राहणार नाही; तो माणसाला माणसाशी जोडणारा सामाजिक संकल्प बनेल. ईद-ए-मिलादचा खरा संदेश एकच, धर्माची ओळख कपड्यांत किंवा घोषणांत नाही, तर ती माणुसकीच्या आचरणात दिसली पाहिजे. ईद-ए-मिलादच्या पवित्र पर्वानिमित्त सर्व मुस्लिम बांधवांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

बहिण भावाच्या पवित्र आणि अतूट प्रेमाचे प्रतिक म्हणजे रक्षाबंधन

सौ. शिल्पा शशिकांत पाध्ये, वर्धा

रक्षाबंधन हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला साजरा केला जातो. या वर्षी श्रावण पौर्णिमेचा प्रारंभ दि.२७.०८.२६ सकाळी ९.०९ ला होतो व समाप्ती दि.२८.०८.२६ ला सकाळी ९.४९ ला आहे. सत्ययुगात देव आणि दानवांमध्ये सलग १२ वर्षे भयंकर युद्ध सुरू होते. त्यावेळी गुरू बृहस्पतींनी इंद्राला सल्ला दिला की, श्रावण महिन्याच्या पूर्णिमा तिथीला त्यांनी एक विशेष धार्मिक विधी (रक्षा विधान) करून स्वतःचा मनगटावर पवित्र रक्षासूत्र बांधून घ्यावे.

हा संवाद ऐकल्यानंतर, इंद्राची पत्नी इंद्राणी शची हिने आपल्या तपोबलाने आणि मंत्रोच्चाराने एक पवित्र आणि शक्तिशाली धागा (रक्षासूत्र) तयार केला. श्रावण पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर शचीने हे अभिमंत्रित रक्षासूत्र देवराज इंद्राच्या उजव्या मनगटावर बांधले आणि त्यांच्या विजयासाठी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. या पवित्र रक्षासूत्राच्या (राखीच्या) दैवी शक्तीमुळे देवराज इंद्रांचे सामर्थ्य आणि आत्मविश्वास कमालीचा वाढला. ते पुन्हा पूर्ण ताकदीने युद्धभूमीवर उतरले. या युद्धात त्यांनी वृत्रासुराचा वध केला आणि राक्षसांचा पराभव करून आपले गमावलेले स्वर्गराज्य पुन्हा मिळवले. या ऐतिहासिक विजयानंतर युद्धाला जाणाऱ्या पुरुषांच्या रक्षणासाठी त्यांच्या पत्नी किंवा घरातील स्त्रिया त्यांच्या हातावर रक्षासूत्र (राखी) बांधू लागल्या. राखीचा धागा नुसताच एक शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे नसून सतत संयम शिकवणारे पवित्र बंधन आहे. या धाग्यामुळे भावनांना ओलावा मिळतो. राखी बांधणे याचा अर्थ बहिणीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे होय. भाऊ नसणाऱ्या बहिणी चंद्राला भाऊ मानून ओवाळतात. किती जवळचं नातं मानलं जातं चंद्राचं आणि बहिणींचं म्हणूनच लहान मुले चंद्राला मामा म्हणतात. दक्षिण भारतात कार्तिक महिन्यात कार्तिकेय सण साजरा केला जातो. या दिवशी बहीण आपल्या भावाला जेवायला बोलावते व भाऊ बहिणीच्या संरक्षणाची जबाबदारी घेतो. चितोडची राणी कर्मावतीने हुमायू बादशहाला राखी पाठवून परकीय आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी विनंती केली व परधर्माचा असूनही त्याने राणी कर्मावतीच्या रक्षणाची जबाबदारी घेऊन पुर्णत्वास नेली.

रजपूत स्त्रीया शत्रूला राखी बांधून भयंकर नरसंहार टाळीत असतं. अशा प्रकारे राखीच्या पवित्र धाग्याने अहिंसा टाळली जात असे. सर्व समुदायात मैत्री आणि एकता वाढविण्यासाठी परस्परांना राखी बांधून सण साजरा केला जातो. बंगालची फाळणी टाळण्यासाठी रविंद्र टागोरांनी राखीला माध्यम बनवले. राखीच्या माध्यमातून नोकर मालकाला, गरीब श्रीमंतांना, जेष्ठ व श्रेष्ठ लोकांना राखी बांधून आपली व आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या रक्षणाची जबाबदारी आपल्यावरच आहे हे सूचीत करतात. राखी पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असेही म्हणतात. सागरा तटी रहाणारे कोळी बांधवांचा हा मोठा सण आहे. या दिवशी कोळी बांधव नटुन थटुन नवीन वस्त्रे परिधान करून, गीत गायन करीत सागराची पूजा करतात व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सागराला नारळ अर्पण करतात आणि समुद्री वादळ वाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी प्रार्थना करुन मासेमारीला सुरुवात करतात. निसर्गाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा देखील हा पवित्र दिवस आहे. बहिण भावाच्या अतूट प्रेमाचा, विश्वासाचा आणि बहिणीच्या सुरक्षेच्या वचनांचे प्रतीक म्हणजे रक्षाबंधन आहे.